# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड

**कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, पो.बॉ.नं. ५०८०, मस्जीद बंदर, मुंबई ४०० ००९**

**(०२२) २३७५२२९४/९८. फॅक्स नं. (०२२) २३७३८२०८ (www.mahamarkfed.org )**


आर्थिक वर्ष २०१८-१९ करीता सी.ए.लेखापारीक्षकाच्या नियुक्ती करीता दि.१४/१२/२०१८ रोजीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने फेडरेशनच्या वेबसाईटवर अपलोड करावयाच्या माहितीचा मसुदा.

दि.१४/१२/२०१८ रोजी दैनिक "पुढारी" मुंबई आवृत्ती, या वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून :-

दि महाराष्ट्र स्टेट कॉ-ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई-९ या संस्थेचे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे १) टॅक्स ऑडीट करणे २) जीएसटी ऑडीट करणे व त्याचे रिटर्न फाईल करणे, इत्यादी कामासाठी सहकार आयुक्त व निबंधक, (सहकारी संस्था) महाराष्ट्र शासन,पुणे यांनी प्रसारित केलेल्या नामिकेतील अ-१ वर्गातील चार्टर्ड अकौटंट फर्म यांचेकडून (Expression of Interest) ऑफर्स मागविण्यात येत आहेत. सीलबंद पाकीटात ऑफर्स १) तांत्रिक लिफाफा २) व्यापारी लिफाफा दि. १९/१२/२०१८ रोजी दु.२.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर व्यवस्थापक (वित्त) यांचेकडे द्यावयाच्या आहेत. दुपारी २.०० वाजेनंतर येणा-या ऑफर्स स्वीकारल्या जाणार नाहीत. महासंघाच्या निविदा समितीसमोर प्रथम तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. त्यात निवड झाली तरच व्यापारी लिफाफा उघडण्यात येईल.

तांत्रिक लिफाफा व व्यापारी लिफाफा वेगळा राहील. तांत्रिक लिफाफ्याला ७० मार्क्स आणि व्यापारी लिफाफ्याला ३० मार्क्स असतील. व्यापारी लिफाफ्यामध्ये प्रत्येक कामाची स्वतंत्र फी नमूद करावी.

तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील बाबी नमूद करणे आवश्यक आहे.

1. फर्म चा रजिस्ट्रेशन नंबर व सर्टीफिकेट
2. सहकार आयुक्त व निबंधक (सह.संस्था)महाराष्ट्र शासन यांच्या नामतालीकेतील वर्ग अ-१ नंबर.
3. आर.बी.आय. यांच्या नामतालीकेतील ग्रेड १ व ग्रेड २ या पैकी असावा.
4. पॅन नंबर
5. जीएसटी नंबर

**<u>तांत्रिक लिफाफ्या संबंधी बाबी :-</u>**

1. फर्मचे हेड ऑफिस मुंबईत असणे आवश्यक आहे. -५ मार्क्स
2. सहकार आयुक्त व निबंधक (सहकारी संस्था) महाराष्ट्र शासन यांच्या नामतालीकेत वर्ग अ-१ असावी. - ५ मार्क्स
3. आर.बी.आय. यांच्या नामतालीकेतील ग्रेड १ व ग्रेड २ या पैकी एक असावी. - ५ मार्क्स.
4. सी.ए.फर्मची मागील ३ वर्षातील मार्च २०१८ पर्यंत सरासरी आर्थिक उलाढाल ही किमान २० लाख असावी त्यासाठी ऑडीटेड बॅलन्सशीट सोबत जोडावी.- ५ मार्क्स.

5. सी.ए. फर्म हि सर्टीफाईड इन्फरमेशन सीस्टीम ऑडीटर असावी. - ५ मार्क्स.

6. शासकीय/निमशासकीय/सहकारी/खाजगी खेत्रातील कामाचा अनुभव असावा. - ५ मार्क्स.
7. कमीत कमी २ संस्थेतील कामाचा (Computer Accountancy Practically knowledge of Tally/Sap ) अनुभव असावा.- ५ मार्क्स.
8. जीएसटीचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असावा. - ४ मार्क्स.
9. ICAI चे Peer Review Certificate असणे आवश्यक आहे. - ५ मार्क्स.
10. टॅक्स ऑडीट आणि जीएसटी ऑडीट करण्याचा आणि त्याच्या पुढील असेसमेंट मधील केलेल्या कामाचा अनुभव असावा. - ६ मार्क्स.
11. सादरीकरण/मुलाखत (Presentation/Interview) - २० मार्क्स

या ११ मुद्यांना एकूण ७० मार्क्स असतील.

**<u>व्यापारी लिफाफ्या संबंधी बाबी :-</u>**

1. आर्थिक वर्ष २०१८-१९ चे टॅक्स ऑडीट पूर्ण करून त्याचे रीटर्न फाईल करणे. याची स्वतंत्र फी देण्यात यावी.
2. आर्थिक वर्ष २०१८-१९ चे जीएसटी ऑडीट पूर्ण करून त्याचा रिपोर्ट सादर करणे. याची स्वतंत्र फी देण्यात यावी.

**या व्यापारी लिफाफ्याला ३० मार्क्स असतील.**

**<u>Earnest Money Deposit :-</u>** Rs.10,000/-(Rs. Ten Thousand only.) जमा करावेत.

१) The Maharashtra state Co-op Marketing Federation Ltd .

२) अकौंट नंबर ४१३५०१७३६

३) इंडियन बँक,शाखा मांडवी

४) IFSC Code - IDIB000M013.

**<u>आर्थिक उलाढालीसाठी</u> :-** फर्म ने आर्थिक वर्ष २०१५-१६,२०१६-१७,२०१७-१८ ची ऑडीटेड बॅलन्सशीट तसेच जीएसटी रिटर्न सोबत देण्यात यावे.

**<u>महासंघाची एकूण कार्यालये :-</u>**

1. प्रधान कार्यालयातील ८ विभाग
2. ५ कारखाने + १ सहयोग खामगाव
3. ३० जिल्हे

**(जिल्ह्यांची नावे** :- ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपुर, गडचिरोली)

**संस्थेचे कारखाने** :- अ) भगीरथ दाणेदार मिश्रखत कारखाने(बुलढाणा, नळदुर्ग, औरंगाबाद)
ब) वैभव व पशुखाद्य कारखाने(बोरविहीर, जि.धुळे , नेप्ती जिल्हा अहमदनगर.
क) तेल प्रकल्प : - खामगाव ,जिल्हा बुलढाणा ,
ड) दुगाडफाटा जिल्हा ठाणे.

**संस्थेचे तेल डेपो** :- वडाळा डेपो, (मुंबई) , मनमाड (नाशिक).

- **टॅक्स ऑडीट :-** आर्थिक वर्ष २०१८-१९ म्हणजे एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीतील टॅक्स ऑडिट पूर्ण करतांना सर्व कार्यालयाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन, तपासणी करून ऑडीट पूर्ण करणे आवश्यक आहे. टॅक्स ऑडिट हे आयकर विभागाच्या नियमानुसार, वेळोवेळी विभागाकडून येणा-या सूचनेनुसार आयकर विभागाने ठरवून दिलेल्या वेळेपूर्वी आयकर विभागाकडे सादर करण्याची जबाबदारी आपली राहील. तसेच त्याचे रिटर्न फाईलींग आयकर विभागाने ठरवून दिलेल्या वेळेपूर्वी करणे हि आपली जबाबदारी राहील. टॅक्स ऑडिट रिपोर्ट आणि त्याचे रिटर्न फाईलिंग हे आयकर विभागाच्या नियमानुसार तसेच बिनचूक सादर करण्याची जबाबदारी आपली राहील. सदरचा ऑडीट रिपोर्ट आणि रिटर्न आयकर विभागाकडे ऑनलाईन अपलोड केल्यानंतर त्याच्या हार्ड कॉपीवर आयकर विभागाच्या सही शिक्क्यासह असलेली पोहोच आमचे कार्यालयाला देण्याची जबाबदारी आपली राहील

- **जीएसटी(वस्तू व सेवाकर)ऑडिट :-** आर्थिक वर्ष २०१८-१९ म्हणजे एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीतील जीएसटी ऑडिट पूर्ण करतांना सर्व कार्यालयाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन, तपासणी करून ऑडीट पूर्ण करणे आवश्यक आहे. जीएसटी ऑडिट हे जीएसटी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या नियमानुसार, वेळोवेळी विभागाकडून येणा-या सूचनेनुसार करण्याची जबाबदारी आपली राहील. जीएसटी विभागाने ठरवून दिलेल्या वेळेपूर्वी जीएसटी विभागाकडे जीएसटी ऑडीट रिपोर्ट सादर करण्याची जबाबदारी आपली राहील. जीएसटी ऑडीट रिपोर्ट मध्ये रिफंड आथवा लायबलिटी येत असल्यास त्याबाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही आपण करणे आवश्यक आहे आणि त्याचे रिटर्न फाईलिंग हे आयकर विभागाच्या नियमानुसार तसेच बिनचूक सादर करण्याची जबाबदारी आपली राहील. सदरचा ऑडीट रिपोर्ट जीएसटी विभागाकडे ऑनलाईन अपलोड केल्यानंतर त्याच्या हार्ड कॉपीवर जीएसटी विभागाच्या सही शिक्क्यासह असलेली पोहोच आमचे कार्यालयाला देण्याची जबाबदारी आपली राहील.

- **हे दोन्ही ऑडीट वेळेपूर्वी आणि बिनचूक पूर्ण करून त्याचे ऑडीट रिपोर्ट संबंधित विभागाला बिनचूक**

  **आणि वेळेपूर्वी सादर करण्याची जबाबदारी आपली राहील.**